# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.10.2024** **वार – सोमवार**

---

**<u>पुणेमेट्रो</u>**

पुणे मेट्रोच्या खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी आणि नळस्टॉप- डहाणूकर कॉलनी-वारजे-माणिकबाग या पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील मार्गिकांना राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मान्यता देण्यात आली. खडकवासला-स्वारगेट- हडपसर-खराडी आणि नळस्टॉप-वारजे-माणिकबाग हा मार्ग ३१ किलोमीटरचा असून या मार्गिकांवर एकंदर २८ स्थानकं असतील. या दोन्ही मार्गिकांसाठी ९ हजार ८९७ कोटी रुपयांच्या निधीला मंजूरी देण्यात आली आहे. हे दोन्ही मार्ग संपूर्ण उन्नत मार्ग आहेत.

खडकवासल्याहून खराडीकडे जाणाऱ्या मेट्रो मार्गामध्ये दळवीवाडी, नांदेड सिटी, धायरी फाटा, माणिकबाग, हिंगणे, राजाराम पूल, पु.ल. देशपांडे उद्यान, दांडेकर पूल, स्वारगेट ही स्थानकं असतील आणि पुढे ही मेट्रो हडपसर मार्गे खराडीला जाणार आहे. तर दुसरी मेट्रो नळस्टॉपपासून पौड फाटा, कर्वे पुतळा, डहाणूकर कॉलनी, कर्वेनगर, वारजे, दौलत नगर -सनसिटी या मार्गे माणिकबागेला जाणार आहे.

या दोन्ही मेट्रो मर्गिकांमुळे वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मदत होणार असून सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम होणार आहे, असं केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे. या निर्णयाबद्दल त्यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत.

राज्य शासनाच्या मान्यतेनंतर आज केंद्र शासनाकडे याबाबतचा प्रस्ताव पाठवला गेला असून या मेट्रो मार्गिकांमुळे शहरातली वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असल्याचं महा-मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी म्हटलं आहे.

**<u>एसटी</u>**

दिवाळीच्या दरम्यान प्रवाशांच्या सोयीसाठी एसटी विभागाकडून जादा बसगाड्या सोडण्यात येतात. यंदा एसटीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी झाल्यामुळे बीड, लातूर, अकोला आणि नाशिक विभागांतून २५० जादा गाड्या मागवण्यात आल्याची माहिती पुणे एसटी विभाग प्रशासनानं दिली आहे.

**<u>आमदार</u>**

पुण्यातील पर्वती मतदारसंघात गेल्या १५ वर्षात आपण नियोजनबध्द काम केल्याने मतदारसंघाचा सर्वांगीण विकास झाला आहे, असं आमदार माधुरी मिसाळ यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. यावेळी देखील या मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी आपण इच्छुक असून पुढच्या पाच वर्षाचा विकास आराखडा देखील तयार केला असल्याचं मिसाळ यांनी सांगितलं.

**<u>गुणीजान</u>**

गुणीजान रिसर्च आर्ट कल्चर अँड एज्युकेशन फाउंडेशनतर्फे प्रसिद्ध हिंदुस्थानी शास्त्रीय गायक पद्मभूषण पंडित सी. आर. व्यास यांच्या 100व्या जयंतीनिमित्त देशपातळीवर गुणीजान बंदिश स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. पंडित व्यास यांच्या बंदिशींवर आधारित या स्पर्धेची उपांत्य फेरी आणि अंतिम फेरी उद्यापासून 19 ऑक्टोबरपर्यंत; ज्योत्स्ना भोळे सभागृह आवारातील, डॉ. श्रीराम लागू रंग अवकाश इथं होणार आहे. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ 20 ऑक्टोबर रोजी संध्याकाळी 6 वाजता होणार असून मान्यवर परीक्षक कलाकारांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार आहे. या संपूर्ण स्पर्धेविषयी आज

पुण्यात पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. 16 ते 30 वयोगटातील गायकांसाठी आयोजित या स्पर्धेत 125 स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या 50 स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली आहे. यात 25 मुली आणि 25 मुले आहेत.

**<u>पेट्रोल पंप चालकांचा बंद</u>**

पेट्रोलियम कंपन्यांकडून विविध मागण्या मान्य होत नसल्याने पुण्यातील पेट्रोल पंपचालकांनी उद्यापासून बेमुदत बंद पुकारण्याची घोषणा केली आहे. असोसिएशनच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत १५ ऑक्टोबरपासून बेमुदत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती पुणे पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपारेल यांनी दिली.

**<u>सोनेजप्त</u>**

तस्करी करुन आणलेलं चार कोटी ४७ लाख रुपयांचं सहा किलो सोनं महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकानं तळेगाव टोल नाका परिसरातून जप्त केलं आहे. याप्रकरणी चौघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<u>क्रीडा</u>**

पुण्यातल्या म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात झालेल्या अखिल भारतीय एसएनबीपी हॉकी स्पर्धेत पंजाबच्या राऊंड ग्लास अकादमीने अजिंक्यपद पटकावले. मुलांच्या 16 वर्षांखालील गटात हे सामने पार पडले. माजी  आंतरराष्ट्रीय हॉकीपटू धनराज पिल्ले यांच्या हस्ते बक्षीस वितरण झालं.

**<u>क्रिकेट</u>**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने ग्रेसिया करंडक खुली आंतर-क्लब टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धा पुण्यात सुरू आहे. या स्पर्धेत पुना क्लबने ॲथलेट ॲकॅडमीचा ५६ धावांनी सहज पराभव करून स्पर्धेत विजयी

सलामी दिली. दुसऱ्या सामन्यात लिजंड्स स्पोर्टर्स क्लबने पीआर क्रिकेट संघा चा ५ गडी राखून पराभव केला आणि सलग दुसरा विजय मिळवला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता असून कमाल तापमान 33 अंशांच्या आसपास असेल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**